कला अकादमी गोवा
कांपाल - पणजी
कअ/रंमेळ/धआ/२०२५-२६/१११९
दि.११/११/२०२५

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीच्या रंगमेळतर्फे भगवान "बिरसा मुंडा" यांच्या जीवन आणि संघर्षावर आधारित "धरती आबा" या नाटकाचा शुभारंभी प्रयोग गुरुवार दि. १३ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ७.00 वा. रविंद्र भवन, काणकोण येथे आयोजित केला आहे.

भारत सरकारने १५ नोव्हेंबर २०२४ ते १५ नोव्हेंबर २०२५ जनजातीय गौरव वर्ष देशभर साजरा करीत आहे. या निमित्ताने गोवा सरकारच्या आदिवासी कल्याण खात्याच्या सहकार्याने या नाटकाची निर्मिती कला अकादमीच्या रंगमेळतर्फे करण्यात आली आहे.

सदर नाटकाचे लेखन ऋषिकेश सुलभ यांनी केले असून गोव्यातील आघाडीचे रंगकर्मी श्री. सुशांत नायक यांची निर्मिती संकल्पना आणि दिग्दर्शन या नाटकाला लाभलं आहे. नाटकाचे नेपथ्य- योगेश कापडी, प्रकाशआयोजन- तेजस खेडेकर, संगीत- सिंधुराज कामत, वेशभूषा- अलीशा मिनेजिस, नृत्य संकल्पना-माधुरी शेटकर, रंगभूषा- सागर हळदणकर यांची आहे. कला अकादमीचे सदस्य सचिव श्री. शंकर बा. गावकर हे या नाटकाचे निर्माते आहेत.

सदर नाटयप्रयोग सर्वांसाठी खुला असून नाटयरसिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. सुशांत नायक)
रंगमेळ प्रमुख
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूं ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)